**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा**

**मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः संदेश शांताराम डोलकर ,

वयः ४४ वर्षे, व्यवसायः कपडेविक्री,

राहणारः खारापटी, ता. रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे दोन वर्षापूर्वी पावसाळयाचे दिवसामध्ये पोलिसांनी मला फिर्यादी सौ.निशा चोरगे हिचे घरासमोर खारापटी गावामध्ये पंचनाम्याकरीता बोलाविले होते. त्यावेळी पोलिस, संदिप केशव चोरगे, फिर्यादी हजर होते. तेथे पोलिसांनी मला एक पावडा व दगड दाखविला. आरोपींचे घर फिर्यादीचे घराचे बाजूला आहे. त्याठिकाणी फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये भांडण झाले होते. त्यांचेमध्ये भांडण कशावरुन झाले हे मला माहिती नाही. नंतर पोलिसांनी माझी सही घेतली.

०२. आता मला दि.२३/०६/२०२० रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. मी सदर पंचनाम्यावर वाचून सही केली नव्हती. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०३. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मी, दुसरा पंच व पोलिसां समक्ष घटनास्थळी तीचे व आरोपीचे भांडण झाल्याचे सांगीतले नव्हते, पावडा व दगड फिर्यादीने पोलिस व आम्हाला दाखविला होता.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे गावातील रहिवाशी आहेत, ते माझे दुरचे नात्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्यांना वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.के.शिंदे यांचे मार्फत सुरु.**

०५. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी निशा चोरगे माझी सख्खी मेव्हणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.२४.११.२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)